तरुण भारत सोमवार २४ नोव्हेंबर २०१४

# शिक्षणाचा उपयोग समाजालाही व्हावा

## डॉ. कुणाल जाधव यांचे आवाहन : दोडामार्गला आजीवन अध्ययन शिबीर

वार्ताहर
दोडामार्ग

विद्यापीठाच्या आजीवन, अध्ययन आणि विस्तार विभागाचा व्याप वाढत असून १८ हजार ५०० विद्यार्थ्यांसह २०१ महाविद्यालये या विभागात सहभागी झाली आहेत. विद्यापीठ कार्यक्षेत्रात ७२९ महाविद्यालये असून अजूनही या विभागाच्या विस्तारास भरपूर वाव आहे. आयुष्यभर शिक्षण घेत असतांना या शिक्षणाचा उपयोग समाजातील तळागाळातील घटकांना होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन मुंबई विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. कुणाल जाधव यांनी केले.

येथील लक्ष्मीबाई हळबे महाविद्यालयात आयोजित केलेल्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या द्वितीय सत्रातील प्रशिक्षण शिबिरात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील होते.

यावेळी व्यासपीठावर क्षेत्र समन्वयक प्राचार्य यशोधन गवस, प्रा. अरुण पणदूरकर, प्रा.डॉ.आर.एस.इंगळे उपस्थित होते. अध्यक्षस्थानावरून बोलतांना प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी दोडामार्गची ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगून आजीवन अध्ययन विभागाची वाटचाल प्रभावीपणे होत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. प्रा. पणदूरकर यांनी शिक्षणाचा समाजासाठी सातत्याने वापर होण्याची गरज प्रतिपादित केली. तर प्राचार्य गवस यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.

यावेळी प्रा. डॉ. जाधव यांचा प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. दुसऱ्या सत्रात प्रा. यशोधन गवस, प्रा. एम.ए.ठाकुर, प्रा. राजेंद्र मुंबरकर, प्रा. एस. एन. पाटील, प्रा. भेंकी आदी विविध महाविद्यालयांच्या विस्तार शिक्षकांनी मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक व स्वागत प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी तर सूत्रसंचालन प्रा. डॉ. बेग यांनी केले. आभार प्रा. डॉ. इंगळे यांनी मानले. या शिबिरात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सर्व २४ वरिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थी व्यवस्थापक, विस्तार शिक्षक व क्षेत्र समन्वयकांनी सहभाग घेतला.



**दोडामार्ग : डॉ. कुणाल जाधव यांचे स्वागत करतांना डॉ. व्ही. ए. पाटील. बाजूला प्रा. अरुण पणदूरकर.**

T.B. 22/11/14